|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-Accredited (3rd Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव, (प्रतिनिधी) दि. २३ सप्टेंबर:: कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्रातर्फे प्राध्यापक प्रबोधिनी अंतर्गत 'संवाद कौशल्य' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. हिंदी विभागाचे प्रा. सुनील कुलकर्णी यांनी शिक्षकांशी संवाद साधला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाषा अभ्यास प्रशाळेचे संचालक प्रा. म. सु. पगारे होते.

प्रा. कुलकर्णी यांनी संत साहित्याच्या माध्यमातून संवाद कौशल्य कसे विकसित होते, यावर मार्गदर्शन केले. संत कबीर, संत तुकाराम आदी संतांच्या साहित्याने समाज प्रबोधना सोबतच विचार, श्रवण, आकलन, अभिव्यक्ती आणि संवेदनशीलता यांसारखी कौशल्ये विकसित होण्यास मदत होते, असे त्यांनी सांगितले. स्पष्ट भाषा, योग्य शब्दांचा वापर, समोरच्यांचे म्हणणे ऐकून घेणे, भावनांवर नियंत्रण आणि परस्पर सन्मान ही प्रभावी संवादाची महत्त्वाची सूत्रे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. नियमित साहित्य वाचनातून संवाद कौशल्य विकसित करता येते, असेही त्यांनी नमूद केले.

अध्यक्षीय भाषणात प्रा. म. सु. पगारे यांनी संवाद कौशल्याच्या विकासात कुटुंब, संस्कार, श्रवणकला आणि अनुभव यांचे महत्त्व अधोरेखित केले. दैनंदिन जीवनातील अनुभवातून व्यक्तीची आचरणबुद्धी विकसित होत असून त्यातून प्रभावी संवाद साधण्याची क्षमता निर्माण होते, असे त्यांनी सांगितले.

यावेळी डॉ. दीपक खरात, डॉ. प्रीती सोनी, डॉ. सुदर्शन भवरे, सहयोगी निखिल तायडे, महेश सूर्यवंशी तसेच संशोधक विद्यार्थी खेमराज पाटील, सुकन्या जाधव आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रतिभा गलवाडे यांनी मानले.

---

कबचौउमवि / १६/ जनसंपर्कविभाग / २०२६ दि. २३ सप्टेंबर, २०२६

प्रती,
मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया,उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी,ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता